॥ श्री ॥
॥ बाबा ॥

## चहा

ऊन ऽऽऽ ऊन ऽऽऽ चहा घ्याहो बाबा देवा
ऊन ऽऽऽ ऊन ऽऽऽ चहा घ्याहो बाबा देवा ॥

त्रिगुणाची चुल तयार करीली
पंचभुतांची हंडी वरी ठेविली
भक्तीची साखर त्यात घातली
नाम रंगीत चहा पुड घातली
प्रेमाची उकळी आतून आली

ऊन ऽऽऽ ऊन ऽऽऽ चहा घ्याहो बाबा देवा ॥

ज्ञानरूपी वेलदोडे त्यात सोडीले
निंदा-स्तुतीचे झाकण वर ठेविले
अज्ञान कांडून अज्ञान काढूनी
ज्ञानी वैराग्यी केशरी बहु रंग आला
आत्मरूपी हा आनंद झाला

ऊन ऽऽऽ ऊन ऽऽऽ चहा घ्याहो बाबा देवा ॥

★★★★★